तात्काळ/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क्र.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:-

27 JUL 2016

प्रति

अध्यक्ष/सचिव,

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड पुणे पंढरपूर रोड, सासवड, ता-पुरंदर, जि-पुणे ४१२३०१

**विषय -** सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत...

**संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**

**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**

**३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. १७.०६.२०१६.**

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने पर्यायसून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ९५४ | पुणे | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड पुणे पंढरपूर रोड, सासवड, ता-पुरंदर, जि-पुणे ४१२३०१ | शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल, सासवड, श्री बी एस सी शिक्षण सोसायटी, सासवड, ता-पुरंदर, जि-पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली ते १० वी) | २०१६-१७ |

**अटी व शर्ती :-**

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतूदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतूदींची पूर्तता करून सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांच्याकडे अर्ज करावेत.

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल होईल.

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करून सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C) प्रमाणपत्र देईल.

परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

संबंधित सक्षम अधिकाऱ्यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

७. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

८. यु-डायस डाटा- या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, **स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा** म्हणून स्वतंत्र पर्याय नमुद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ यांचे कार्यालय
27 JUL 2016

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,**

**१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

**१. मा. रा.ग.गुंजाळ, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२**

**२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.**

Xerox copy, Original not given.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ स्वयंअशाळा//८०
पुणे १ दिनांक :- १६/११ /२०१८

प्रति,

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**

**श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,सासवड संचालित शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल,सासवड ता.पुरंदर जिल्हा पुणे**

**विषय:-** सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ :-** १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १, ६ व २४) २ जुलै २०१३.

२. मा.शिक्षण उपसंचालक, पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.शिउस /खाप्राशा/स्वयंअशाळा/मान्यता/पुवी२०/ १६२६२/ दिनांक-२७.७.२०१६
२१/२/२०१८

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तीवर नविन शाळा साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| १ | **श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,सासवड संचालित पुणे पंढरपुर रोड,सासवड, ता.पुरंदर,जि.पुणे** | **शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कूल,सासवड ता.पुरंदर जिल्हा.पुणे** | इंग्रजी | नविन शाळा (सीबीएसई ) | प्राथमिक ते उच्च प्राथमिक इ १ ली ते इ ८ वी | २०१६-१७ |

**अटी व शर्ती**

१ संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२ शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३ या अधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.

४ संदर्भ क्रमांक ०२ अन्वयेसन २०१६-१७ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.

५ परवानगी मिळाल्या पासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.

६ परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.

७ शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

९ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना **UDISE-२७२५१११०९२९** मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१० शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रत माहितीसाठी सविनय सादर-**
**१)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.**
**२)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१**
**३)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**

Pune Zilla Parishad, Pune,
Yashwantrao Chavan, Bhavan
Department of Education (Primary)
Ja.Kra.Z.P.Shikshan/Prath./Khaprasha/SwayamShala/780/18
Pune 1 Date :- 16/11/2018

To,

**The Chairman / Secretary / Headmaster**
**Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Saswad, Sanchalit**
**Shivaji English Medium School Saswad Tal. Purandar, District Pune.**

**Subject :-** Granting permission for the academic year 2015-16 under Maharashtra self financed school (establishment and regulation ) act 2012 to establish a new school on self financed basis, as well as up gradation of the existing school.

**References:-** 1) under Maharashtra self financed school (establishment and regulation) act 2012 (Government of Maharashtra Gazette Extraordinary Nos. 1,6, and 24) 2 July 2013

2) Order of Deputy Director of Education Pune Ja.Kra/ShiUSa/KhaPraSha/ SwayamaShala/Manyata/PuVee201/16262/Date 27/07/2016.

21/02/2018

As per the above subject hereby inform you that, your institution has filed a proposal for establishment of new school. As per the proposal your institution has granted a first recognition as per reference no 2 on the following terms and conditions.

| Sr. No | Name of the institution and its address | Name and address of the permitted school | Medium | Type of school new school/up gradation | Granted classes | Remark |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal Sanchlit Pune Pandharpur Road Saswad, Tal. – Purandar, Dist. Pune | Shivaji English Medium School Saswad, Tal.-Purandar, Dist. Pune | English | New school (cbse) | Primary to higher primary 1st to ~~10th~~ 8th | 2016-17 |

## TERMS AND CONDITIONS

1) No changes may be made in the future in the prescribed medium, place(location ) of the school etc. by the institution for which they are permitted. .
2) The government has given permission to place where to start a new school if classes are started in a place other than permission given will be automatically cancelled.
3) Classes are permitted in accordance with the provisions of this Act.
4) New school permission is granted for the academic year 2016-17 as per reference number 2.

Renuka Singh
**MANAGER**
Shivaji English Medium School
Saswad Tal. Purandar, Dist. Pune

MsPathak
**PRINCIPAL**
Shivaji English Medium School
Saswad, Tal. Purandar, Dist. Pune

Shivaji English Medium School
Saswad Tal. Purandar, Dist. Pune

Shivaji English Medium School
Saswad, Tal. Purandar, Dist. Pune

पुणे जिल्हा परिषद, पुणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर-
१)मा. अवर सचिव, शालेय शिक्षणवक्रीडाविभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२)मा. शिक्षण संचालक(माध्य.व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१
३)मा. शिक्षण संचालक(प्राथमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

5) If the class are not started within eighteen months from the date of permission, the permission will be cancelled.

6) It will be mandatory to the classes permitted to abide by all the provisions of the Right to Free and Compulsory Education Act 2009, Maharashtra Self-financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012, procedure and order issued by the Government from time to time.

7) It will be mandatory to put up a notice board in the front area of the school building stating that self-finance basis permitted class for the information of all the public.

8) All the recognized School under the Maharashtra Self finance Schools (Establishment and Regulation) Act, 2012 cannot be relocated in future.

9) Schools permitted under the Maharashtra Self financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 will be required to register separately as self-finance classes while filling in the information in UDISE 27251110929.

10) It will be mandatory to implement the existing rules of the government and the rules that the government will prescribe from time to time.

...tap
...L.B.
...ndir
...andar,
...1
...05436707

**Education Officer (Primary)**
**Pune Zilla Parishad Pune**

**Compliments submitted for copy information**

1) In inferior Secretary, Ministry of School Education and Sports, ministry Mumbai 32.
2) Director of Education (secondary and Higher Secondary) Directorate of Education Maharashtra State Pune 1
3) Director of Education (Primary) Directorate of Education Maharashtra State Pune 1

I certify that I am competent to translate from Marathi to English and that the above Letter is a complete and accurate translation to the best of my knowledge and belief.

**Signature of Translator :-**

**Name of Translator** :- Adv. Shashank Madhukar Jagtap

**Address:-** Opp. Shri . Kalawati Mata mandir, Jagtap Ali, Old Post office, Saswad, Tal:- Purandar, Dist:- Pune
**Mobile No. :-** 9405436707

**Date** :- 27/06/2020

Adv. Shashank M. Jagtap
B.A. LL.B.
R/o- Opp. Kalawatimata Mandir
Jagtap Ali, Saswad, Tal- Purandar,
Dist- Pune- 412301
MAH./2903/2003, Mo:- 9405436707

Date :- 27/06/2020

MANAGER
Shivaji English Medium School
Saswad Tal. Purandar, Dist. Pune

PRINCIPAL
Shivaji English Medium School
Saswad, Tal. Purandar, Dist. Pune

पुणे जिल्हा परिषद

**माध्यमिक शिक्षण विभाग**

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत), सोमवार पेठ, पुणे-११

परवानगी वर्ष-२०१६-१७
परवानगी प्रकार- दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष-२०१९-२०

जाक्र.पुजिप/उच्च.माध्य/२०२०/३६५६/२०
दिनांकः- ९ /१२/२०२०

**स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

प्रति,

१. अध्यक्ष/सचिव, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड, ता.पुरंदर जि पुणे
२. मुख्याध्यापक/प्राचार्य, शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कुल, सासवड, ता. पुरंदर जि पुणे

**विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत.**
**(इयत्ता-९ वी प्रथम)**

**संदर्भ** :- १.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२.
२. शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र.१४२/एस.एम-२ दि.१४ जुलै,२०१७.
३. शिक्षण उपसंचालक,पुणे यांचेकडील पत्र जाक्र.उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
४. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ दिनांक. १६ जुन,२०१६.
**५. संबंधित शाळेकडील प्रस्ताव दिनांक-२१/०९/२०२०.**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र.४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रम | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग (इयत्ता व शाखा) | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन निर्णय जा.क्र.एसएफएस-१०१६/ प्र.क्र.६९/एसएम-२ दिनांक. १६ जुन,२०१६.<br>यादीतील क्रमांक – ९५४ | श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड, ता.पुरंदर जि पुणे | शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कुल, सासवड, ता. पुरंदर जि पुणे<br>UDISE- २७२५१११०९२९ | इंग्रजी | सी.बी.एस.ई | इ ९ वी प्रथम | २०१९-२० | |

**अटी व शर्ती-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदींची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.
४. U-DISE (Unified District Information System for Education) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अद्ययावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.
५. सर्व संबंधितांच्या माहितीसाठी **स्वयंअर्थसहायित तत्त्वारील नवीन/दर्जावाढ परवानगीप्राप्त शाळा** असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेद्वारावर लावणे आवश्यक राहील.
६. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.
७. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.

पुणे जिल्हा परिषद

**माध्यमिक शिक्षण विभाग**

यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत), सोमवार पेठ, पुणे-११

जाक्र.पुजिप/माध्य/नै.वा/ ८०९८ /२१

दिनांक:- २४/११/२०२१

परवानगी वर्ष-२०२०-२१
परवानगी प्रकार-
शाळा सुरु वर्ष-

**स्वयंअर्थसहायित तत्त्वारील परवानगीप्राप्त शाळा**
**नैसर्गीकवाढ मान्यता**

प्रति,

१. **अध्यक्ष/सचिव**, श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड ता.पुरंदर जि पुणे

२. **मुख्याध्यापक/प्राचार्य**, शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कुल, सासवड ता. पुरंदर जि पुणे

विषय :- स्वयंअर्थसहायित तत्त्वावर नवीन शाळेस नैसर्गीकवाढ देणेबाबत.
(इयत्ता- १०वी)

**संदर्भ** :- १.या कार्यालयाकडील प्रथम मान्यता पत्र **जाक्र.पुजिप/माध्य/२०२०/३६५६/२० दिनांक:-०९/११/२०२०**
२.संबंधित शाळेकडील प्रस्ताव दिनांक- ०५/०८/२०२१

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस/ विद्यमान शाळेला नैसर्गीकवाढ **देणेबाबत** संदर्भ क्र.१ अन्वये प्रथम मान्यता परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना नैसर्गीकवाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता. आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गांना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून नैसर्गीकवाढ मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय, यादीतील क्रम | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | नैसर्गीकवाढ मान्यता वर्ग | मान्यता वर्ष | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि.दिनांक- १६/०६/२०१६<br>यादीतील क्रमांक- ९५४ | श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड ता.पुरंदर जि पुणे | शिवाजी इंग्लिश मिडीयम स्कुल, सासवड ता. पुरंदर जि पुणे<br>UDISE- २७२५१११०९२९ | इंग्रजी | सी.बी.एस.ई | इ. १० वी. | २०२१-२२ पासून | |

**अटी व शर्ती-**

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तिच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ मधील तरतूदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
२. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस, (अ)शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम-२०१२ मधील सर्व तरतूदीचे पालन करणे बंधनकारक राहील.
३. जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालविता येणार नाहीत.
४. SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर (शाळा, विद्यार्थी, शिक्षक,इत्यादी बाबतची) माहिती भरणे व ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक राहील.
५. शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अद्ययावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.
६. वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत. पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
७. शाळेत पात्राताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.
८. व्यवस्थापकीय संस्था ही, विहित केलेले नियम, मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील असेल.
९. शालेय शुल्क निश्चित करताना, महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन) अधिनियम-२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.
१०. एखाद्या शाळेने, त्यांना लागू असलेल्या कायद्यातील कोणत्याही तरतूदीचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास, विद्यार्थ्यांच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहीन शैक्षणिक कामगिरी केल्यास, शाळेची मान्यता/परवानगी काढून घेण्यात येईल.
११. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

११. जनहित याचिका क्रमांक-४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

a. शाळेमध्ये पुरेशी व सुयोग्य अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी. (Fire Audit)
b. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येऊ नयेत
c. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
d. शाळेची इमारत, सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building Code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकांप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी
e. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. (Structural Audit)
f. ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

(सुनंदा वाखारे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

प्रत, माहितीस्तव,
१.मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे-१
२.मा.विभागीय सचिव, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५